जा.क्र.वि.शा./निवडणूक कक्ष/ /२०२६
विशेष शाखा, पिंपरी चिंचवड
दिनांक :-२९ .१०.२०२६

विषय :- भारतीय नागरीक सुरक्षा संहिता -२०२३ चे कलम १६३ प्रमाणे आदेश.

संदर्भ :- १.भारत सरकार निवडणुक आयोग यांचेकडील पत्र क्र.ECI/PN/118/2026 date 22.09.2026 अन्वये
२. विभागीय आयुक्त, कार्या. पत्र क्र.साप्र-४/निवडणुक/वशि/३३७/२०२६ दि.२२.०९.२०२६ अन्वये

आदेश

ज्याअर्थी, मा.भारत निवडणुक आयोग यांचेकडील पत्र क्र.मा.भारत निवडणुक आयोग यांचेकडील पत्र क्र ECI/PN/118/2026 dt.22.09.2026 रोजीच्या प्रसिध्दी प्रत्रकान्वये शिक्षक व पदवीधर मतदार संघ निवडणुका-२०२६ चा निवडणुक कार्यक्रम घोषित केले असून त्याबाबतचे पत्र मा.विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांच्या कडुन याकार्यालयास प्राप्त झाले आहे. दि.२३.१०.२०२६ रोजी मतदान व दिनांक २७.१०.२०२६ रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. दिनांक २२.०९.२०२६ रोजी पासुन आदर्श आचारसंहीता लागु झालेली असुन, दि.३१.१०.२०२६ रोजी पर्यंत निवडणुक प्रक्रिया संपेपर्यत अस्तित्वात राहणार आहे.

त्याअर्थी, निवडणुक प्रक्रिया,मतदान शांततेत निर्भयपणे व निःपक्षपाती वातावरणात पार पडावे तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी या करिता पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत दि.२०.१०.२०२६ रोजी पासुन ते दि. ३१.१०.२०२६ रोजी पर्यत खालील कृत्यास मनाई आदेश जारी करणे जरुरीचे आहे.

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीत मी डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, पिंपरी चिंचवड, पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्राअंतर्गत शिक्षक व पदवीधर मतदार संघ निवडणुका-२०२६ चे अनुषंगाने शस्त्र परवानाधारक यांना शस्त्र ताब्यात ठेवण्यास व बाळगण्यास मनाई करण्यात येत आहे. तथापि छाननी समितीने ज्यांना सवलत दिलेली आहे. त्या शस्त्र परवानाधारकांना हा मनाई आदेश लागू होणार नाही.

यापुढे असाही आदेश देण्यात येत आहे की, ज्या शस्त्र परवानाधारकांना छाननी समितीने सवलत दिलेली आहे, त्या परवानाधारकांनी आपली शस्त्रे निवडणूकीच्या कोणत्याही कार्यक्रमा दरम्यान उदा. सभा, रॅली, मतदान व मतमोजणी प्रसंगी जवळ बाळगू नये. प्रत्येक शस्त्र परवानाधारकास आदेशापुर्वी नोटीस बजाविणे शक्य नसल्याने, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता- २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे.

सदरचा आदेश पिंपरी चिंचवड, पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रात **दिनांक २०.१०.२०२६ रोजी रात्रौ ००.०१ वा पासून ते दिनांक ३१.१०.२०२६ चे २४.०० वा. पर्यंत** अंमलात राहील.

उपरोक्त मनाई आदेशाचे उल्लंघन करणा-या शस्त्र परवानाधारकांवर भारतीय न्याय संहिता कलम २२३ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल. आदेशाचे उल्लंघन करणारे इसमावर खटला दाखल करणेसाठी मी सर्व पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना या आदेशाद्वारे प्राधिकृत करत आहे.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दिनांक२९ /१०/२०२६ रोजी दिला आहे.

सह पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड

(डॉ.शशिकांत महावरकर)
पोलीस सह आयुक्त,पिंपरी-चिंचवड

ठिकाण :- पिंपरी - चिंचवड
दिनांक :-२९ /१०/२०२६

प्रत सविनय सादर :-

१. मा. अतिरिक्त मुख्य सचिव, गृह (विशेष) मंत्रालय, म.रा. मुंबई
२. मा. पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई
३. मा. आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा. मुंबई
४. मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.
५. मा. सह पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.
६. मा. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड.

प्रत - सस्नेह अग्रेषित :-

१. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग
२. मा. आयुक्त पुणे म.न.पा./ पिं.चिं.म.न.पा.
३. मा. जिल्हा सत्र न्यायाधिश पुणे
४. मा. जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, पुणे

प्रत :-

१. सर्व पोलीस उप आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.
२. सर्व सहा.पोलीस आयुक्त, विभाग, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.
३. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे- १, यांचेकडे आवश्यक त्या प्रसिध्दीसाठी.
४. व्यवस्थापक, येरवडा मध्यवर्ती कारागृह मुद्रणालय, पुणे. ६ यांचेकडे राजपत्रात प्रसिध्दी देण्यासाठी .
५. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, इतर शाखा मधील पोलीस निरीक्षक

यांनी आपल्या हद्दीमध्ये या आदेशाची जास्तीत जास्त प्रसिध्दी होण्यासाठी ध्वनीक्षेपकाद्वारे किंवा अन्य मार्गाने प्रसिध्दी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करावा.